जनसंपर्क कक्ष
25 OCT 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘ए. डी. सायंटिफिक इंडेक्स’मध्ये शिवाजी विद्यापीठाचे ८० संशोधक

## कुलगुरू, प्र-कुलगुरूंचाही समावेश; विद्यापीठास देशात २५ वे स्थान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

‘ए.डी. सायंटिफिक इंडेक्स’तर्फे नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या ‘वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२३’मध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्यासह ८० संशोधक-प्राध्यापकांचा समावेश झाला आहे.

एच इंडेक्स, आय-१० इंडेक्स आणि विविध सायटेशन्सच्या आधारे काढलेल्या निर्देशांक यादीत मागील वर्षी असलेल्या संशोधकांनी त्यांचे स्थान कायम राखले आहे. यंदा आणखी संशोधकांचा त्यात समावेश झाला आहे. शिवाजी विद्यापीठास देशातील ११०३ शैक्षणिक संस्थांच्या यादीत देशात २५ वे स्थान प्राप्त झाले आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांचा एच-इंडेक्स हा सर्वाधिक म्हणजे ७९ आहे. त्यांच्या संशोधनास ४६ हजार ४०८ इतकी प्रचंड सायटेशन्स प्राप्त झाली आहेत.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी संख्याशास्त्र विषयात संशोधन केले आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांना भौतिकशास्त्रातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान प्राप्त झाले आहे. यादीत आजी-माजी संशोधकांसह देश-विदेशांत कार्यरत संशोधक विद्यार्थी-शिक्षकांसह निवृत्त प्राध्यापकांचाही समावेश आहे. ‘ए.डी. सायंटिफिक इंडेक्स २०२३’च्या यादीत विद्यापीठातील डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. पी.एस. पाटील, एस.पी. गोविंदवार, केशव राजपुरे, सी.एच. भोसले, आण्णासाहेब मोहोळकर, ज्योती जाधव, के.एम. गरडकर, संजय कोळेकर, अनिल घुले, एस.डी. डेलेकर, राजेंद्र सोनकवडे, एन. आय. तरवाळ, जी.बी. कोळेकर, विजया पुरी, एस.आर. सावंत, तुकाराम डोंगळे, प्रमोद वासंबेकर, राजश्री साळुंखे, एम.बी. देशमुख, के.डी. सोनवणे, टी.जे. शिंदे, जॉन डिसुझा, गजानन राशिनकर, दिलीप दगडे, एस.बी. सादळे, मानसिंग टाकळे, पी.डी. राऊत, अशोक गडकरी, ए.के. साहू, संतोष पायघन, निखिल गायकवाड, किशोर कुचे, एम.व्ही. सांताकुमार, आर.आर. मुधोळकर, पी.बी. दंडगे, राहुल रणवीर, दत्तात्रय गायकवाड, किरणकुमार शर्मा, नीरज राणे, पंकज पवार, नीलम डिगे, टी.व्ही. साठे, एन.आर. प्रसाद, अनंत दोड्डमणी, उत्कर्ष मोरे, एन.एस. चव्हाण, एस.जी. घाणे, सतीश पाटील, सोनल चौंदे, विजय कोरे, एस.एस. कांबळे, निरंजना चव्हाण, सुहास कदम, क्रांतिवीर मोरे, आर.व्ही. गुरव, एस.आर. यंकंची, आसिफ तांबोळी, व्ही.ए. सावंत, चेतन आवारे, शशीभूषण महाडिक, सचिन पन्हाळकर, एम.एम. डोंगरे, संभाजी शिंदे, कबीर खराडे, प्रयागराज फांदीलोलू, एम.पी. भिलावे, हेमांगी कुलकर्णी, नितीन कांबळे, सुरेश सूर्यवंशी, जयवंत पाताडे, मिलिंद सुतार, मेधा नानिवडेकर, इराण्णा उडचण, कविता ओझा, एस.एम. गायकवाड, पी.एस. कांबळे, विनायक विठ्ठल गावडे यांना स्थान मिळाले आहे.



कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के



प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

“ ए.डी. सायंटिफिक इंडेक्स क्रमवारीत शिवाजी विद्यापीठाचे गतवर्षी ४८ संशोधक होते. ही संख्या आता दुप्पट झाली आहे. विज्ञान विषयांव्यतिरिक्त विद्याशाखांमधील संशोधकांचा समावेश झाला आहे. स्टॅनफोर्डच्या दोन टक्के संशोधकांमध्ये स्थान प्राप्त झाल्याच्या बातमीपाठोपाठ आता ए.डी. सायंटिफिक इंडेक्समध्ये विद्यापीठातील संशोधकांची संख्या वाढल्यामुळे विद्यापीठातील संशोधनाचा टक्का व संशोधनाची गुणवत्ता या बाबी अधोरेखित झाल्या आहेत.

- **डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

लोकमत

# 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स' रॅंकिंगमध्ये विद्यापीठाचे यश

## देशात २५ वे : ८० प्राध्यापकांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स'ने जाहीर केलेल्या 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२३'मध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह एकूण ८० संशोधक-प्राध्यापकांचा समावेश झाला आहे. एच इंडेक्स, आय-१० इंडेक्स आणि विविध सायटेशन्सच्या आधारे निर्देशांक यादी काढली आहे. शिवाजी विद्यापीठास देशातील ११०३ शैक्षणिक संस्थांच्या यादीत देशात २५ वे स्थान प्राप्त झाले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांचा एच-इंडेक्स हा सर्वाधिक ७९ इतका आहे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी संख्याशास्त्र विषयात संशोधन केले आहे. ए.डी. सायंटिफिक इंडेक्सच्या यादीत डॉ. एस.पी. गोविंदवार, केशव राजपुरे, सी.एच. भोसले, आण्णासाहेब मोहोळकर, ज्योती जाधव, के.एम. गरडकर, संजय कोळेकर, अनिल घुले, एस.डी. डेलेकर, राजेंद्र सोनकवडे, एन. आय. तरवाळ, जी.बी. कोळेकर, विजया पुरी, एस.आर. सावंत, तुकाराम डोंगळे, प्रमोद वासंबेकर, राजेश्री साळुंखे, एम.बी. देशमुख, के.डी. सोनवणे, टी.जे. शिंदे, जॉन डिसूझा, गजानन राशिनकर, दिलीप दगडे, एस.बी. सादळे, मानसिंग टाकळे,





पी.डी. राऊत, अशोक गडकरी, ए.के. साहू, संतोष पायघन, निखिल गायकवाड, किशोर कुचे, एम.व्ही. सांताकुमार, आर.आर. मुधोळकर, पी.बी. दंडगे, राहुल रणवीर, दत्तात्रय गायकवाड, किरणकुमार शर्मा, नीरज राणे, पंकज पवार, नीलम डिगे, टी.व्ही. साठे, एन.आर. प्रसाद, अनंत दोड्डमणी, उत्कर्ष मोरे, एन.एस. चव्हाण, एस.जी. घाणे, सतीश पाटील, सोनल चोंदे, विजय कोरे, एस.एस. कांबळे, निरंजना चव्हाण, सुहास कदम, क्रांतीवीर मोरे, आर.व्ही. गुरव, एस.आर. यंकंची, आसिफ तांबोळी, व्ही.ए. सावंत, चेतन आवारे, शशीभूषण महाडिक, सचिन पन्हाळकर, एम.एम. डोंगरे, संभाजी शिंदे, कबीर खराडे, प्रयागराज फांदीलोलू, एम.पी. भिलावे, हेमांगी कुलकर्णी, नितीन कांबळे, सुरेश सूर्यवंशी, जयवंत पाताडे, मिलिंद सुतार, मेधा नानिवडेकर, इराण्णा उडचण, कविता ओझा, एस.एम. गायकवाड, पी.एस. कांबळे, विनायक विठ्ठल गावडे या संशोधकांचा समावेश आहे.

२५ OCT 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षा प्रक्रिया होणार अधिक पारदर्शक

## शिवाजी विद्यापीठ बनवणार स्वतःची एस. आर. पी. डी. प्रणाली

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : परीक्षा अधिक पारदर्शक आणि कमी कालावधीच्या होण्यासाठी सध्या रिमोट पेपर डिलिव्हरी (एस. आर. पी. डी.) ही प्रणाली वापरली जाते. सध्या विद्यापीठाने ही प्रणाली बाहेरून घेतली आहे. आता विद्यापीठ स्वतः एस. आर. पी. डी. प्रणाली बनवणार असून पुढील उन्हाळी सत्रापासून ती वापरात येईल. यामुळे विद्यापीठाच्या परीक्षा अधिक पारदर्शक, कमी कालावधीत होणार आहेत. तसेच यामध्ये पैशांचीही बचत होणर आहे. अशा पद्धतीने स्वतःची प्रणाली बनवणारे



शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील पहिलेच विद्यापीठ असेल.

विद्यापीठाच्या परीक्षा हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. कोरोनानंतर परीक्षा प्रक्रियेत अनेक नवीन सकारात्मक बदल होत आहेत. पूर्वी

> **'एस. आर. पी. डी. ही परीक्षा प्रणाली अतिशय चांगली आणि पारदर्शक आहे. विद्यापीठ स्वतः ही प्रणाली बनवणार असून, त्यासाठीची प्रक्रिया लवकरच सुरू होईल. यामुळे परीक्षा कमी वेळेत, कमी खर्चात, अधिक पारदर्शक पद्धतीने होतील. पुढील उन्हाळी सत्रात या प्रणालीच्या माध्यमातून परीक्षा होणार आहेत.**
> – **प्रा. डॉ. अजितसिंह जाधव**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

परीक्षा घेण्यासाठी खूप पूर्वतयारी आवश्यक होती. यामध्ये प्रश्नपत्रिका छापणे आणि त्यातील गोपनीयता ठेवणे आवश्यक असते. कोरोनानंतर परीक्षा पद्धतीमध्ये अनेक बदल झाले आहेत. आता विद्यापीठाच्या परीक्षा एस. आर. पीडी प्रणालीप्रमाणे होतात. यामध्ये परीक्षा घेणारे, विषयांचे प्रमुख यांना स्वतंत्र लॉगिन असते. त्याचबरोबर सुरक्षेच्या अन्य बाबीही आहेत. मात्र, सध्या ही प्रणाली विद्यापीठाकडे नाही. त्यामुळे बाहेरून ही प्रणाली घेऊन या वर्षीच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा घेण्यात आल्या.

मात्र, आता विद्यापीठाने स्वतःची एस. आर. पी. डी. प्रणाली बनवण्याचे निश्चित केले आहे. २०२३-२४ या उन्हाळी सत्रातील परीक्षा विद्यापीठ स्वतःच्या एस. आर. पी. डी. प्रणालीचा उपयोग करून घेणार आहे.

### एस. आर. पी. डी.चे लाभ

- पारदर्शक पद्धत, कमीत कमी मानवी हस्तक्षेप
- परीक्षा प्रक्रियेचा कालावधी कमी
- प्रश्नपत्रिका कोणी, कधी, कोठे डाउनलोड केली हे समजते
- प्रश्नपत्रिका स्वीकारली गेली की पाच ते सात दिवसांत प्रश्नपत्रिका बनवणाऱ्यांचे पैसे मिळणार

यासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळ तंत्रज्ञांची एक टीम बनवणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष प्रणालीच्या निर्मितीला सुरुवात होईल. या प्रणालीमुळे परीक्षेचा कालावधी पूर्वीपेक्षा कमी होईल. तसेच छपाईचा खर्चही कमी होणार आहे. परीक्षा केंद्रावर विशिष्ट वेळेत त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना प्रश्नपत्रिका पाठवली जाते. त्यांच्या स्वतंत्र लॉगिनवरून प्रश्नपत्रिका डाउनलोड केली जाते. तीन प्रश्नपत्रिका डाउनलोड केल्या जातात. त्यानंतर कोणत्या क्रमांकाची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना द्यायची हे सांगितले जाते. यामुळे वेळ आणि पैसे दोन्हीची बचत होते.

पुण्यनगरी

# करदात्यांच्या रकमेचा विनियोगपूर्वक वापर करा

## केरळ विद्यापीठाचे प्र. कुलगुरू अजयकुमार यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर :** करदात्यांची रक्कम पारदर्शक ठेवून निधी देणाऱ्या संस्थेला योग्य चित्र दिसले पाहिजे, असे प्रतिपादन केरळ विद्यापीठाचे प्र. कुलगुरू टी. पी. अजयकुमार यांनी केरळ विद्यापीठातील स्तुती प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी केले.

भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, स्तुती (सिनरजिस्टिक ट्रेनिंग प्रोग्रॅम अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) योजनेंतर्गत केरळ विद्यापीठाच्या उपकरणे आणि सुविधेसाठी असणाऱ्या केंद्रीय प्रयोगशाळा आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी विद्यापीठाचे प्राध्यापक आर. जी. सोनकवडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपूर्ण देशामध्ये होत आहे. प्रा. जी. एम. नायर यांनी समारोपप्रसंगी आठवडाभराच्या कार्यक्रमाचा आढावा घेतला. याप्रसंगी केरळ विद्यापीठाचे सिंडिकेट सदस्य के. जी. गोपचंद्रन, स्तुतीचे समन्वयक आणि शिवाजी विद्यापीठाचे प्रा. आर. जी. सोनकवडे आदी उपस्थित होते.

# भगवान महावीरांचे जीवनरंग विश्लेषण



प्रासंगिक

डॉ. विजय ककडे

जीवनात रंगसंगती महत्वपूर्ण असते, रंगशास्त्र हे मानवी मनाचे प्रतिबिंब असते. या आधारावर मनोविश्लेषण करणारी पद्धती विकसित झाली असून सर्व उत्सवांना आकर्षक रंगसंगतीचा मोठा आधार असतो. केवळ कृष्णधवल चित्र रटाळ, रसहीन वाटते; परंतु बहुरंगी चित्र आबालवृद्धांना आकर्षित करते. याचा कल्पक व व्यापारी वापर जाहिरातीतून आपणास सतत दिसत असतो. हेच रंगबहार भगवान महावीरांनी 'लेश्या' विश्लेषणातून अत्यंत मूलभूतपणे मांडले असून जैन तत्वज्ञानाचा महत्त्वपूर्ण परंतु दुर्लक्षित असा रंगविचार आज आपण सविस्तर पाहू.

जैन विचारधारेत रंगसूत्रे ही धर्म आणि अधर्म प्रवृत्तीदर्शक मानले आहेत, ही एकूण सहा रंगसूत्रे विविध टप्प्यात एखादी व्यक्ती अनुभवू शकते. या अशा रंगप्रभावाच्या विविध व्यक्ती समाजघटकात व्यक्त होत असतात. त्याची ओळख जर आपण योग्य रीतीने करू शकलो तर आपला प्रतिसाद (प्रतिक्रिया नव्हे) आपण विचारपूर्वक ठरवू शकतो व महत्वाचे म्हणजे आपण आपल्या अंतरंगाचे परीक्षण करून आपणातही बदल करू शकतो. या दृष्टीने हे रंग बहार विश्लेषण आधारभूत ठरते.

लेश्या विश्लेषणानुसार अधर्म पातळीवर तीन रंग असून हे काळा रंग, निळा रंग व कपोत किंवा पारवा (करडा) रंग असे आहेत. धर्म पातळीवरील तीन रंग हे (लेश्या) लाल, पिवळा व पांढरा असे आहेत. या वर्ण विश्लेषणाच्या तपशीलातून व्यक्ती प्रवृत्ती समजू शकतात, कोणताही समाज अथवा व्यक्ती कायमस्वरूपी एकाच रंगात असत नाही. त्याचे अधःपतन किंवा उच्च स्तरावर अधर्माकडून धर्म मार्गाकडे प्रगती होऊ शकते. अधर्माचा तळ म्हणून काळा रंग ओळखला जातो. या रंगाचे वैशिष्ट्य हेच आहे की, सर्व प्रकाश पूर्णतः स्वतःकडे ठेवणारी, स्वार्थाचे अतिसघन प्रमाण दाखवणारे असते. यामध्ये प्रतिबिंबित होणाऱ्या व्यक्ती इतक्या स्वार्थी असतात की, दुसऱ्याचे नुकसान करणे यातच त्यांना समाधान असते. प्रसंगी स्वतःचे नुकसान झाले तरी त्यांना चालते. परपीडक प्रवृत्ती स्वतः दरिद्री असतातच, पण दुसऱ्याचे सुख यांना आपल्या गरिबीपेक्षा, त्रासापेक्षा अधिक दुःख देते. यांच्याबाबत एक प्रतिकात्मक कथा आहे. एका भक्ताने भगवान शंकराची खूप तपस्या केल्याने त्याला हवा तो 'वर' मागण्यास सांगितले, पण त्याबरोबर एक अट घातली की, तुला जे मिळेल त्याच्या दुप्पट तुझ्या शत्रुला मिळेल! आता पंचाईत झाली. पण, त्याला हवा तसा 'सल्लागार' भेटला व त्याने सांगितल्याप्रमाणे भक्ताने आपला एक डोळा जावा असे म्हटले. परिणामी त्याचा एक डोळा गेला, पण शत्रुचे दोन डोळे गेले! नील रंग लेश्या ही प्रवृत्ती कृष्ण लेश्याप्रमाणे स्वार्थी असली तरी याची नकारात्मक प्रवृत्ती हिंसक असत नाही. आपले नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाते. वरकरणी यांचे वर्तन इतरांना उपकारक, मदतकारक, प्रेमपूर्वक वाटते; परंतु हे सर्व जोपर्यंत आपले नुकसान न होता चालते तोपर्यंतच चांगले वर्तन करतात. पत्नीवर असणारे प्रेम, भाऊ-बहीण, नातेवाईक यांच्यावर असणारे प्रेम ते उपयोगी आहे तोपर्यंतच टिकते. स्वार्थाच्या आड येत असेल तर नातेसंबंध मोडण्यास ते तयार असतात. अशा नीललेश्या व्यक्तींना शिक्षेचे भय दाखवून त्यांचे अहितकारक वर्तन नियंत्रित करणे शक्य असल्याने अशा व्यक्ती कृष्णलेश्या इतक्या घातक नसतात. सर्वसाधारणपणे एकूण लोकसंख्येत नीललेश्या प्रवृत्ती ७० टक्क्यांपर्यंत असतात. पाणी गळ्यापर्यंत आल्यानंतर माकड आपल्या पिलाला पायाखाली घेऊन जीव वाचवते, ही कथा नीललेश्या व्यक्त करणारी आहे.

अधर्म लेश्यामध्ये सर्वात उच्च स्तरावरील लेश्या ही कपोत किंवा कबुतराच्या रंगाची, करड्या रंगाची असते. ही प्रवृत्ती असणारी व्यक्ती प्रसंगी स्वतःच्या किरकोळ नुकसानीकडे दुर्लक्ष करून दुसऱ्याच्या हितास प्राधान्य देते. दुसऱ्यास त्रास देणे, नुकसानकारक विचार व कृती केली जात नाही. वरकरणी मदत करणारी, सभ्यतेच्या मर्यादा सांभाळणारी व्यक्ती या कपोतलेश्या प्रकारात येतात. एकूण व्यावहारिक समाजजीवन सामंजस्यपूर्ण पद्धतीने टिकवण्यास यांचा हातभार लागतो. पापभीरु असे यांचे वर्तन असते. कायद्याचा धाक, समाजप्रतिष्ठा यांच्या दबावातून योग्य वर्तन घडते. पण, सिग्नलच्या ठिकाणी पोलीस नसल्यास पसार होण्याचा प्रयत्नही करणारे हेच असतात. आपले नुकसान होऊ नये यासाठी प्रयत्न करणारे स्वार्थप्रवण अशी ही स्वभाव लेश्या आहे. धर्मलेश्या या मानवापासून देवत्वाकडे, प्रगतशील वाटचाल करणारे रंग प्रभा, 'आभा' दर्शवतात. या प्रकारची आभा किंवा रंगलेश्या अग्निवर्ण किंवा लाल रंगाच्या नंतर पीतवर्ण, सुवर्ण रंग किंवा पिवळ्या रंगाच्या व श्वेतवर्ण किंवा पांढऱ्या रंगाच्या असतात. अग्निवर्ण अथवा लाल रंग प्रचंड ऊर्जा दर्शवणारा धर्मलेश्यातील पहिल्या टप्प्यावरचा असतो. स्वार्थ, अहंभाव, अहंकार, 'मी'पणा हा तेजोमय लेश्यात नष्ट झालेला असतो. आपल्या तत्वप्रसारासाठी दुसऱ्यावर प्रभाव टाकणारी धगधगणारी प्रखर लेश्या हिंदू धर्माने स्वीकारलेली दिसते. यानंतरची धर्मलेश्या सुवर्ण किंवा पिवळ्या रंगाची असून बुद्ध धर्म विचार व्यक्त करणारा आहे. प्रारंभाइतकीच धर्ममार्गावरील वाटचाल महत्त्वाची असते. जसे आहे तसे स्वीकारणारा 'तथागत' विचार वर्तमानाचे पूर्ण भान ठेवणारा व स्वप्रयत्नावर भर देणारा आहे. पीतलेश्या त्याग, संयम याचे प्रतिरूप असून स्वतःचा मार्ग स्वतः प्रयत्नपूर्वक निवडण्यावर भर देतो. स्वत्वाचा त्याग केलेली ध्यानमग्न अवस्था पीतवर्ण व्यक्त करते. अष्टांग मार्ग दुःख निवारण करणारे व अंतिम कल्याण करणारे आहे. मध्यम मार्गाचा गौतम बुद्धांनी स्वीकारला तो भूतकाळ व भविष्यकाळ यातील मध्यम मार्ग वर्तमानकाळ व्यक्त करतो. आपल्या भिक्खूना पिवळे वस्त्र निवडण्यात पीतलेश्या महत्वाची होती. भगवान महावीरांनी व सकल जैनधर्माने श्वेतलेश्या स्वीकारली ती धर्ममार्गावरील सर्वोच्च लेश्या मानली. सर्व रंग एकत्रित असणारा पांढरा रंग हा जसा सर्वसमावेशक आहे, तसेच सर्वपूर्तता झाल्याचेही दर्शक आहे. सर्व प्रकारचे राग, लोभ, यापासून मुक्तता असणारी अवस्था श्वेतलेश्या व्यक्त करते. सर्व लेश्या शुभ्रतेत रुपांतरीत होतात. कोणतीही जिवेस्ना, आशा, आकांक्षा नसलेली, मोक्षप्रद असणारी शुभ लेश्या शेवटच्या टप्प्यावर आहे. लेश्या किंवा अंतरंगाची 'आभा' ही कायमस्वरूपी नसते. अगदी शेवटच्या टप्प्यावरही कृष्णलेश्या ही श्वेतलेश्या बनू शकते. अंतिम उद्दिष्ट सर्वच धर्म विचारात मुक्तीचा केंद्रित विचार असून हिंदू विचार प्रवाहात ब्रह्म पद गौतम बुद्ध विचारधारेत निर्वाण व जैन विचारधारेत 'केवल' अवस्था प्राप्तीकडे जाण्याचे मार्ग आहेत. आपल्या अधर्म अवस्थेतून धर्म अवस्थेकडे जाण्यात महत्वाचे मैलाचे (किलोमीटरचे!) दगड या लेश्या किंवा रंगआभा आहेत. याचे मापन करणारी शास्त्रीय साधने असल्याचा दावाही केला जातो. याबाबत व्यापक, सखोल संशोधन केल्यास याची अधिक स्पष्टता येऊ शकेल. मानसशास्त्रात होत असणारी प्रगती, 'मनोभाव' व त्यावर परिणाम करणारे घटक, औषधप्रणाली विकसित करीत असून याबाबत प्राचीन ज्ञान आधारभूत ठरू शकेल. आभामंडल किंवा रंगलेश्या व बाह्य पोषाख यांचा संबंध जोडणे व तसा तर्क करणे हे मात्र योग्य ठरणार नाही. महावीरांचे रंगशास्त्र किंवा लेश्या विज्ञान अंतरंगाशी निगडीत आहे. ही बाब महत्वाची आहे.

संपर्क : ९४२२४२३९४१